Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 18/08/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## प्रतिभावान गीतकार, चित्रपट निर्माते गुलजार



प्रसिद्ध गीतकार, चित्रपट निर्माते आणि कवी गुलजार यांचा जन्म १८ ऑगस्ट १९३४ रोजी झाला. हिंदी चित्रपटसृष्टीसह हॉलिवूडमध्येही त्यांनी छाप सोडली आहे. तेरे बिना जिंदगी से शिकवा नहीं, मैंने तेरे लिए सात रंग के सपने ही अप्रतिम गाणी त्यांनीच लिहिली आहेत. गुलजार यांना ३६ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. ब्रिटिश भारतातील झेलम जिल्ह्यातील दिना गावात (सध्या पाकिस्तानात) माखन सिंग कालरा आणि सुजन कौर यांच्या पोटी गुलजार यांचा जन्म झाला. त्यांचे नाव संपूर्ण सिंह कालरा. ते नंतर गुलजार म्हणून ओळखले जाऊ लागले. माखन सिंग यांनी तीन विवाह केले होते. गुलजार त्यांच्या दुसऱ्या पत्नीचा मुलगा. त्यांच्या जन्मानंतर लगेचच त्यांच्या आईचे निधन झाले, त्यानंतर माखन सिंग यांच्या तिसऱ्या पत्नीने त्याचे पालनपोषण केले.

त्यांच्या कुटुंबाचे दीना येथे कपड्यांचे दुकान होते. काही काळाने वडिलांनी दिल्लीतील सदर बाजार याठिकाणी बॅग आणि टोपीचे दुकान उघडले. गुलजारही वडिलांसोबत दिल्लीला आले. दिल्लीतील दिवसांची आठवण करून देताना ते म्हणतात की, दुकान सांभाळण्यासाठी गोडाऊनमध्ये झोपायचे. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून घरी जायचे आणि तिथून शाळेत जायचे. जेवण आटोपून ते रात्री आठच्या सुमारास परत गोडाऊनमध्ये जायचे. लवकर झोपायचीही सवय नव्हती. लाईटची सोय नव्हती आणि टाईमपास करण्याचे साधन नव्हते. ही आपत्ती त्याच्यासाठी संधी देणारी ठरली. गोडाऊनसमोर पुस्तकांचा स्टॉल होता, तिथे भाड्याने पुस्तके मिळत होती. वेळ घालवण्यासाठी गुलजार यांनी पुस्तके वाचायला सुरुवात केली. १९७१ मध्ये आलेला 'मेरे अपने' हा गुलजार यांचा दिग्दर्शनातील पदार्पणाचा चित्रपट होता. त्यांनी १७ चित्रपटांचे दिग्दर्शन केले. हूतूतू (१९९९) या चित्रपटानंतर त्यांनी दिग्दर्शन करणे बंद केले. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर आपटला होता. चित्रपटाचे अपयश गुलजार यांना सहन झाले नाही आणि ते डिप्रेशनमध्ये गेले. या काळात त्यांची मुलगी मेघनाने त्यांना सर्वात जास्त साथ दिली आणि या परिस्थितीतून बाहेर काढले. ज्ञानपीठ, पद्मभूषण या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

Nashik Edition
Aug 18, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHAULGAON · CENTRAL LIBRARY · YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401